**TickMark.Ai**
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 | **Subject:** Marathi | **Time:**2 hrs
**Date:** 11-10-2025 | **Paper:** Semester 1 | **Marks:**80

**(विभाग - १ : गद्य)**

**1(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) (1) तक्ता पूर्ण करा : (2)

| उताऱ्यात उल्लेख असलेली नदी | पु. ल. व सुनीताबाई यांनी दिलेल्या शालीचा लेखकाने उताऱ्यात केलेला उल्लेख |
|---|---|
| | |

(2) खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती लिहा : (1)
एका बाईचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत होते.

एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, ''तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

(2) (1) खालील वाक्यांतील कृतींतून किंवा विचारांतून कळणारे लेखकाचे गुण शोधा. (1)
बाईला हाक मारून खिडकीतून शाल व नोटा दिल्या

(2) 'पुलकित' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा. (1)

(3) "या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती." या वाक्याचा अर्थ तुमच्या शब्दात स्पष्ट करा. (3)

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) (1) आकृतीबंध पूर्ण करा : (1)




(2) खालील विधाने सत्य असत्य सांगा : (1)
(i) अब्दुल तपोवनात कानातले विकायला जात असे.
(ii) तपोवनाच्या कमानीचा आकार गोलाकार होता.

अब्दुल बसस्टॉपवर आला. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. बस आली. बांगड्यांची पेटी आणि

TickMark.Ai

पिशवी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला. अगदी खिडकीजवळ बसला. पेटी अलगद उचलून त्याने आपल्या मांडीवर ठेवली. गर्दीत कुणाचा धक्का लागला तर...? लाल, हिरव्या , निळ्या रंगीबेरंगी बांगड्यांकडे मोठ्या कौतुकाने त्याने बघितले. बस सुरू होताच थंडगार वाऱ्याचा झोत अधिकच त्रासदायक वाटू लागला. अब्दुलने मफलर कानाला घट्ट लपेटून घेतला. जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली. तपोवनाकडे कोण जातोय कशाला? जेमतेम पाच-सहाच उतारू राहिले बसमध्ये . तपोवनाच्या त्या गोलाकार कमानीकडे अब्दुलचे लक्ष गेले. गेल्या सहा महिन्यांत केवढी फुलली आहे तिच्यावरती वेल. मागे आलो तेव्हा जेमतेम हातभर होती. अब्दुल गेटजवळ आला आणि लहान लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरुवात केली.

"चुडीवाऽला आऽऽला, चुडीऽऽवाला आला.''

आंब्याच्या झाडाखाली असलेल्या चौथऱ्यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी अब्दुलच्या आजूबाजूला जमली. ''त्या लाल रंगाच्या मला...त्या हिरव्या मला...चुडीवाला, माझ्यासाठी आरसा आणला? मागच्या वेळी मी सांगितलं होतं नं?"

(2) उत्तर लिहा : (2)

(i) तपोवनाच्या कमानीचा आकार -

(ii) अब्दुल चौथऱ्यावर कोणत्या झाडाखाली बसला -

(iii) अब्दुल तपोवनात किती दिवसांनी आला -

(iv) अब्दुलकडे असलेल्या बांगड्यांचे रंग -

(3) अब्दुल मनापासून तपोवनात जात असे, हे उताऱ्यातून कसे स्पष्ट होते तुमच्या मते सांगा. (3)

**(अपठित गद्य)**

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(4)**

(1) योग्य जोडया लावा : (2)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) सूर्य | पाणी |
| (ii) मेघ | वस्त्र |
| (iii) शेतकरी | प्रकाश |
| (iv) विणकर | धान्य |

TickMark.Ai

संयमाला तुच्छ मानू नका. तुच्या विकासासाठी तो आहे. समाजाच्या हितासाठी तो आहे. आपण संयम पाळला नाही, तर आपले काम नीट होणार नाही. काम नीट झाले नाही म्हणजे समाजाचे नुकसान होणार. आपण केवळ आपल्या स्वतः साठी नाही. आपण समाजासाठी आहोत, याची जाणीव आपणांस हवी. हा आपला देह हे आपले जीवन समाजाचे आहे. | आपले पोषण सारी सृष्टी करीत आहे. सूर्य प्रकाश देत आहे, मेघ पाणी देत आहेत, वृक्ष फुले-फळे देत आहेत, शेतकरी धान्य देत आहे, विणकर वस्त्र देत आहे. आपण या सर्व सजीव-निर्जीव सृष्टीचे आभारी आहोत. यासाठी हे आपले जीवन त्यांच्या सेवेत अर्पण करणे हे आपले काम आहे.

(2) एका शब्दात उत्तरे लिहा.

(i) आपल्या विकासासाठी आवश्यक असलेला – .................

(ii) आपले पोषण करणारी – .................

**(विभाग - २ : पद्य)**

**2(अ) कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **(8)**

(1) (1) कोण ते लिहा : (1)

(i) भक्ताच्या हाकेला धावून येणारा

(ii) भुकेल्या वासराचा आवाज ऐकताच हंबरणारी

(2) 'चातक ज्या आतुरतेने ढगांना पाऊस घेऊन घेण्याची विनवणी करतो त्याच ओढीने मी तुझी वाट पाहत आहे' या अर्थाची अभंगातील ओळ शोधून लिहा. (1)

'नाम म्हणे मेघ जैसा<br>विनवितो चातक तैसा।।<br>' अग्निमाजि पडे बाळू ।<br>माता धांवें कनवाळू ।।१।।

तैसा धांवें माझिया काजा ।
अंकिला मी दास तुझा ।।२।।
सवेंचि झेंपावें पक्षिणी ।
पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।
भुकेलें वत्सरावें ।
धेनु हुंबरत धांवे ।।४।।
वणवा लागलासे वनीं ।
पाडस चिंतीत हरणी ।।५।।
नामा म्हणे मेघा जैसा ।
विनवितो चातक तैसा ।।६।

(2) प्रश्न तयार करा : (2)

(i) 'चातक' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(ii) मेघाला विनवणी करणाऱ्या कोणत्या पक्ष्याचे नाव प्रस्तुत अभंगात आले आहे ?

(3) खालील शब्दांचे अर्थ सांगा : (2)

(i) अंकिला (ii) धेनु (iii) पाडस (iv) अग्निमाजी

(4) "वणवा लागलास वनी। पाडस चिंतीत हरणी।। (2)
नाव म्हणे मेघ जैसा। विनवितो चातक तैसा।। " या ओळींतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुदद्यांच्या आधारे कृती सोडवा : (8)**

(1) अंकिला मी दास तुझा'

१. प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री : (०१ गुण)
२. प्रस्तुत कवितेचा विषय : (०१ गुण)
३. प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहिणे (०२ गुण)
'सवेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।'
४. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)
५. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण (०२ गुण)

(2) दोन दिवस

१. प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री : (०१ गुण)
२. प्रस्तुत कवितेचा विषय : (०१ गुण)
३. प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहिणे (०२ गुण)
'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
४. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश (०२ गुण)
५. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - (०२ गुण)

**(विभाग - ३ : स्थूलवाचन)**

**3) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (6)**

(1) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

(2) आधी केले मग सांगितले या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

(3) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांस वाटते ?

**(विभाग - ४ : भाषाभ्यास)**

**4(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती : (8)**
**(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा : (2)**

(1) किती छान आहे ते फुल !

(2) बातम्या तूच वाचून दाखव.

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रुपांतर करा :** **(2)**

(1) आपल्याकडे कोणी तरी येतंय. (प्रश्नार्थी करा.)

(2) जगी सर्व सुखी असा कोण आहे? (विधानार्थी करा)

**(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (फक्त दोन) :** **(4)**

(1) मळमळ व्यक्त करणे

(2) चेहरा पडणे

(3) मोर्चा वळवणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**
**(1) शब्दसंपत्ती :**
**(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :** **(1)**

(i) प्रजा -
(ii) प्रत -

**(2) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :** **(1)**

(i) कल्याण x
(ii) कष्टाळू x

**(3) वचन बदला :** **(1)**

(i) शेंगा -
(ii) गणित -
**(4)** **(1)**
(1) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा (1)
कमी आयुष्य असणारा -

**(2) खालील कृती सोडवा :** **(2)**
(1) खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा (1)
नीसर्गाने घेतलेलं हे वळन आहे.
(2) अचूक शब्द ओळखा (1)
वीनम्र, विनम्र, वीनर्म, विनृम

**(3) विरामचिन्हे :** **(2)**
(1) खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून लिहा (1)

| चिन्ह | नांव |
|---|---|
| ? | ............... |
| ; | .............. |
| ! | .............. |
| ' ' | .............. |

(2) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करुन वाक्ये पुन्हा लिहा (1)
सुश्रुत ओळखलंस मला अरे मी आहे कविता.

**(विभाग - ५ : उपयोजित लेखन)**

**5(अ) खालील कृती सोडवा :** **(6)**
**(1) पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणती ही एक कृती सोडवा.

TickMark.Ai

सरस्वती ग्रंथ भांडार यांच्या तर्फे वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी
भव्य ग्रंथविक्री
उद्यापासून ७ दिवस
बालमित्रांसाठी आकर्षक पुस्तके
शालेय अभ्यासक्रमात उपयुक्त पुस्तकांवर भरघोस सवलत
शाळांसाठी विशेष सवलत
स्थळ : नूतन विद्या निकेतन शाळेचे पटांगण , डोंबिवली
वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.००
संपर्क : ९२५४६३८५७४

तुमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तके खरीदण्यासाठी, पुस्तकांचे दर, सवलत, पुस्तकांची यादी मागविणारे पत्र लिहा.

किंवा

तुम्ही घेतलेल्या काही पुस्तकांची आतील पाने खराब असल्याने ती पुस्तके बदलून देण्याबाबत पत्र लिहा.

**किंवा**

**(2) सारांशलेखन :**
**विभाग 1 गद्य (इ) (प्र. क्र. 1- इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

TickMark.Ai

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** **(10)**
**(1) जाहिरात लेखन :**

योगासन वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(2) बातमी लेखन :**

वृद्ध दिनानिमित्त संपन्न झालेल्या वरील कार्यक्रमाची बातमी तयार करून लिहा.

**(3) कथालेखन :**

पुढील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :
मुद्दे : एक दूधवाला (गवळी) - दुधात पाणी घालून विकणे - श्रीमंत बनणे - गावी जाण्यास निघणे - वाटेत नदी - पाणी पिण्यास जाणे - पैशाची पिशवी झाडाखाली ठेवणे - वरती माकड - पिशवी पळवणे - दुधवाल्याने माकडाला दगड मारणे - माकडाने एक एक नोट खाली फेकणे - काही नोटा जमिनीवर तर काही नोटा पाण्यात फेकणे - काही नोटा जमिनीवर तर काही नोटा पाण्यात पडणे - दूधवाला मनात विचार करतो, "पाण्याचा पैसा पाण्यात".

**(इ) लेखनकोशल्य : खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **(8)**
**(1) प्रसंगलेखन :**

खालील मुद्दयांच्या आधारे पावसाळयातील एका दिवसाचा तुम्ही घेतलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

निसर्गदृश्य ⟵ **पावसाळयातील एक दिवस** ⟶ आनंददायी वातावरण
↓
अविस्मरणीय दिवस

**(2) आत्माकथन :**

वरील घटक तुमच्याशी बोलतो आहे अशी कल्पना करा व त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.




**(3) वैचारिक :**

"मी माझ्या देशाचा नागरिक" या विषयावर खालील मुद्दे विचारात घेऊन लेखन करा.
मुद्दे : जबाबदार नागरिक - हक्क व कर्तव्ये यांची जाणीव - देशाच्या सदयस्थितीचे ज्ञान - स्वतःचे वागणे - देशप्रेम व राष्ट्रीयत्व यांची जाणीव. वरील मुद्दे केवळ मार्गदर्शक आहेत.

All the Best

TickMark.Ai